# योहानाचे तिसरे पत्र

[1]वडिलाकडून, माझा प्रिय मित्र गायस ज्याच्यावर मी सत्यामध्ये प्रीती करतो त्यास,

[2]माझ्या प्रिय मित्रा, जसे आध्यात्मिक जीवनात तुझे चांगले चालले आहे हे मला माहीत आहे तसेच इतर बाबतींतही तुझे चांगले चालावे आणि तुझे आरोग्य चांगले असावे अशी मी प्रार्थना करतो. [3]जेव्हा काही बंधू आले आणि सत्यात तू सातत्याने कसे चालतोस याविषयी त्यांनी साक्ष दिली आणि तू सत्याविषयीच्या विश्वासूपणाबद्दल मला सांगितले तेव्हा मला फार आनंद झाला. [4]माझी मुले सत्यात चालतात हे ऐकून जितका आनंद मला होतो तितका इतर कशानेही होत नाही.

[5]माझ्या प्रिय मित्रा, विश्वासणाऱ्यांच्या कल्याणासाठी जे काही करणे तुला शक्य आहे ते तू विश्वासूपणे करीत आहेस. तू ज्यांना ओळखतही नाहीत असे ते लोक आहेत. [6]जे बंधू आले व ज्यांनी तू दाखवलेल्या प्रीतीविषयी मंडळीसमोर साक्ष दिली, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी देवाला आवडेल अशा प्रकारे [7]शक्य ते सर्व कर, कारण ते ख्रिस्ताच्या सेवेसाठी दौऱ्यावर निघाले आहेत व अविश्वासणाऱ्यांकडून त्यांनी काहीही स्वीकारले नाही. [8]म्हणून आपण विश्वासणाऱ्यांनी त्यांना मदत केलीच पाहिजे. यासाठी की आपण सत्यासाठी एकमेकांचे भागीदार होऊ.

[9]मी मंडळीला पत्र लिहिले पण दियत्रेफस ज्याला त्यांचा नेता व्हायचे आहे, तो आम्ही जे सांगतो ते स्वीकारीत नाही. [10]या कारणामुळे जेव्हा मी येतो तेव्हा तो जो करीत आहे ते दाखवून देईन. तो वाईट शब्दांनी खोटेपणाने माझ्याविरुद्ध बोलत आहे व एवढ्यावरच तो समाधान मानीत नाही, तर त्यात भर म्हणून बंधूंचा तो स्वीकार करीत नाहीच, उलट मंडळीतील जे लोक त्यांचा स्वीकार करू इच्छितात त्यांना अडथळा करतो, आणि त्यांना मंडळीबाहेर घालवतो!

[11]माझ्या प्रिय मित्रा, जे चांगले आहे त्याचे अनुकरण कर. वाइटाचे अनुकरण करू नको. जे चांगले आहे ते जो करतो, तो देवाचा आहे. जो वाईट करतो त्याने देवाला पाहिले नाही.

[12]प्रत्येकजण देमेत्रियाविषयी चांगली साक्ष देतात व सत्यदेखील तसेच सांगते. आणि आम्हीदेखील त्याच्याविषयी तसेच म्हणतो, आणि तुम्हांला माहीत आहे की, आमची साक्ष खरी आहे.

[13]मला तुला पुष्कळ गोष्टी लिहावयाच्या आहेत पण मला शाई व लेखणीने तुला लिहावे असे वाटत नाही. [14]त्याऐवजी, तुला लवकर भेटण्याची मला आशा आहे. मग आपल्याला समोरासमोर बोलता येईल. [15]तुझ्याबरोबर शांती असो. तुझे सर्व मित्र तुला सलाम सांगतात. तेथील सर्व मित्रांना नावाने आमचा सलाम सांग.

## नोंद